ePaper
राजस्थानमध्ये फटाका फॅक्टरीत स्फोट; 7 कामगारांचा कोळसा

वर्ष - 9 । अंक - 172 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™

WWW.MAHAENEWS.COM | मंगळवार, दि. 17 फेब्रुवारी 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!






पान 2 वरुन...

भाजप-काँग्रेस कार्यकर्त्यांवर गुन्हे

## राष्ट्रीय अध्यक्षांच्या निवडीसाठी २६ फेब्रुवारीला कार्यकारिणी बैठक

# राष्ट्रवादीत आता सुनेत्रा पर्व!

**महाईन्यूज । मुंबई**

**राज्यात एकीकडे राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलिनीकरणाची चर्चा सुरू असताना दुसरीकडे पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाची निवड कधी होणार याचीही उत्सुकता सर्वांनाच आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. त्यानुसार, पदभार स्वीकारत कामाला देखील सुरुवात केली आहे. त्यामुळे, आता राष्ट्रवादीच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाची निवड कधी होणार, अध्यक्षपदी कोणाची वर्णी लागणार याची चर्चा आणि उत्सुकता राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांसह इतर पक्षातील नेत्यांनीही लागली आहे. त्यातच,आज सुनेत्रा पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या राष्ट्रवादीच्या बैठकीत राष्ट्रीय अध्यक्षपदाच्या निवडीची तारीख आणि नाव ठरलं आहे.**



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष पदाच्या निवडीची तारीख ठरली असून 26 फेब्रुवारीला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षांच्या निवडीची कार्यकारिणीची बैठक पार पडणार आहे. याच बैठकीत सुनेत्रा पवार यांच्या नावावर शिक्कामोर्तब केलं जाईल, अशी माहिती विश्वसनीय सूत्रांकडून देण्यात आली आहे. त्यामुळे, गेल्या काही दिवसांपासून राष्ट्रीय अध्यक्षपदाच्या निवडीवरुन दोन्ही राष्ट्रवादीतील पदाधिकारी आणि आमदार, खासदारांमध्ये काही प्रमाणात सुरू असलेल्या चर्चेला आता पूर्णविराम मिळणार आहे.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या उपस्थितीत आज राष्ट्रवादीच्या आमदार, खासदार आणि प्रमुख नेत्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत राष्ट्रीय अध्यक्षपदाच्या निवडीसंदर्भाने चर्चा करण्यात आली असून 26 फेब्रुवारी रोजी ही निवड करण्यात येणार असल्याचे समजते. राष्ट्रवादीच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी प्रफुल पटेल यांचे नाव आघाडीवर होते, त्यातच केंद्रीयमंत्री पियुष गोयल यांनीही एका मुलाखतीत त्यांचं नाव घेतल्याने राजकीय वर्तुळात वेगळीच चर्चा सुरू होती. मात्र, आता राष्ट्रवादीकडून सुनेत्रा पवार यांचेच नाव निश्चित करण्यात आल्याची माहिती आहे.



## विलिनीकरणावर माध्यमांत चर्चा नको

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या आमदारांच्या बैठकीत विलिनीकरणाच्या संदर्भात तूर्तास चर्चा नाही. विलिनीकरणाच्या संदर्भात बाहेर माध्यमांमध्ये बोलू नये अशा सूचना बैठकीत आमदारांना दिल्या आहेत. पक्ष संघटना वाढ, राष्ट्रीय अध्यक्ष निवड आणि अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या संदर्भातील चर्चा आजच्या बैठकीत झाल्याची माहिती आहे.

## नरेश अरोरांच्या बंधुंनी घेतली सुनेत्रा पवारांची भेट


दरम्यान, सुनेत्रा पवार यांनी दोन दिवसांपूर्वी पुण्यातील सर्किट हाऊस येथे जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निकालानंतर विजयी झालेल्या सदस्यांच्या भेटीसाठी घेत आहेत. तेव्हा, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राजकीय सल्लागार नरेश अरोरा यांचे बंधू सुनेत्रा पवार यांच्या भेटीसाठी दाखल झाले होते, पार्थ पवार आणि जय पवार हेही उपस्थित होते. या भेटीत देखील राष्ट्रवादीच्या राष्ट्रीय अध्यक्षांची निवडीची चर्चा झाली होती. त्यानंतर, आता तारीख निश्चित करण्यात आली आहे. या बैठकीत सुनेत्रा पवार यांच्या नावावर शिक्कामोर्तब होईल.

# भाजप-काँग्रेस कार्यकर्त्यांवर गुन्हे

## शिवाजीनगर पोलीस ठाण्यात परस्पर विरोधी तक्रारी दाखल

**महाईन्यूज । पुणे**

**काँग्रेस भवन परिसरात रविवारी भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांनी केलेल्या आंदोलन केले. झटापट, तसेच दगडफेक केल्याची घटना घडल्यानंतर या प्रकरणी भारतीय जनात पक्ष, काँग्रेस कार्यकर्त्यांनी परस्पर विरोधी फिर्यादी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात दाखल केल्या. परस्परविरोधी फिर्यादीनंतर भारतीय जनता पक्षाचे शहराध्यक्ष नगरसेवक धीरज घाटे, तसेच काँग्रेसचे पदाधिकारी नगरसेवक अरविंद शिंदे यांच्यासह कार्यकर्त्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.**




काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्यविषयी अवमानकारक वक्तव्य केल्याच्या निषेधार्थ भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांनी रविवारी काँग्रेस भवनसमोर आंदोलन केले. सपकाळ यांनी केलेल्या वक्तव्याच्या निषेध केला. या वेळी भारतीय जनता पक्ष आणि काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये झटापट झाली. दोन्ही बाजूच्य कार्यकर्त्यांनी दगडफेक केली.

या घटनेत काँग्रेसचे तीन, तसेच भाजपचे दोन असे पाच कार्यकर्ते किरकोळ जखमी झाले. दोन पोलीस कर्मचारी, दोन पत्रकार किरकोळ जखमी झाले, अशी माहिती सहपोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा यांनी दिली. या प्रकरणात दोन्ही बाजूंविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याचे सहपोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा यांनी स्पष्ट केले होते.

त्यानंतर रात्री उशीरा भारतीय जनता पक्षाचे शहराध्यक्ष नगरसेवक धीरज घाटे, युवा मोर्चाचे पदाधिकारी दुष्यंत मोहोळ यांच्यासह ५० ते ६० कार्यकर्त्यांविरुद्ध शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत काँग्रेसच्या कार्यकर्त्या प्राची नितीन दुधाणे (वय ४२, रा. दुधाणेनगर, कर्वेनगर) यांनी फिर्याद दिली आहे. या प्रकरणाचा तपास गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अमर काळंगे करत आहेत.

दरम्यान, भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी पुनीत श्रीकांत जोशी (वय ३५, रा. आयडियल कॉलनी, कोथरूड) यांनी परस्परविरोधी फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, काँग्रेसचे पदाधिकारी अरविंद शिंदे, गौरव बाळंदे, अक्षय जैन, सागर धाडवे यांच्यासह कार्यकर्त्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. सहायक पोलीस निरीक्षक संजय पांढरे तपास करत आहेत.

> “दोन्ही पक्षाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अशा प्रकारच्या आंदोलनात जर अशा घटना घडत असतील. तर ते पुन्हा होऊ नये याची पोलिसांकडून खबरदारी घेण्यात येणार आहे. यानंतर राजकीय पक्षाचे कार्यालय किंवा निवासस्थान किंवा इतर पदाधिकाऱ्यांचे कार्यालय, कुठेही कोणत्याही प्रकारच्या आंदोलनाला परवानगी देणार नाही. जी घटना काल घडलेली आहे. त्यामध्ये जे कोणी दोषी आहेत. त्यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल. आणि पुढे असं होता कामा नये यासाठी पुणे शहर पोलीस पूर्ण खबरदारी घेणार आहे. पुढील तपासामध्ये प्रत्यक्ष कोणाकोणाची चूक आणि जबाबदारी आहे. ते निश्चित करून कायदेशीर कारवाई करण्यात येईल.
>
> - अमितेश कुमार, पोलीस आयुक्त.

# पुणे महापालिकेला मिळणार ३०७ कोटींचा निधी!

**महाईन्यूज । पुणे**

**महापालिकेच्या निवडणुकीनंतर नवीन सभागृह अस्तित्वात आल्याने महापालिकेला १५ व्या वित्त आयोगाकडे रखडलेले तब्बल ३०७ कोटींची अनुदान मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. केंद्राकडून २०२०-२१ ते २०२५-२६ काळासाठी महापालिकेला ८२४ कोटींचे अनुदान मंजूर झाले होते. मात्र, २०२२ पासून लोकनियुक्त सदस्य नसल्याचे कारण देत आतापर्यंत महापालिकेस केवळ ५१७ कोटींची अनुदान देण्यात आले. नवीन सभागृह अस्तित्वात आल्याने हे अनुदान महापालिकेला मिळण्यातील अडचण दूर झाली आहे.**

महापालिकेला मंजूर झालेला निधी मिळावा, यासाठी महापालिका प्रशासनाने नगरविकास विभागाच्या माध्यमातून प्रयत्न देखील केले होते. मार्च महिन्यात हा ३०७ कोटी रुपयांचा निधी महापालिकेला मिळण्याची शक्यता आहे. केंद्र सरकारने महापालिकेला निधी मंजूर केला त्यावेळी महापालिकेचे मुख्य सभागृह अस्तित्वात होते. मात्र, मार्च २०२२ मध्ये सभागृहाची मुदत संपली. इतर मागासवर्गीय आरक्षणाच्या मुद्द्यामुळे पुणे महापालिकेसह राज्यातील अनेक स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडल्या होत्या.

महापालिकेत लोकनियुक्त प्रतिनिधी नसल्याचे कारण पुढे करून केंद्राकडून महापालिकेला मिळणारे हे अनुदान थांबविण्यात आले होते. आता निवडणुका पूर्ण होऊन महापालिकेची सर्वसाधारण सभा अस्तित्वात आली असून, दोन बैठका देखील झाल्या आहेत. त्यामुळे अनुदान मिळण्यासाठी असलेला अडसर दूर झाला आहे. हे अनुदान मिळविण्यासाठी प्रशासनाने पुन्हा एकदा केंद्र सरकारकडे पत्रव्यवहार सुरू केला आहे.

शहरातील हवा प्रदूषण रोखण्यासाठी ३८१ कोटी ९० लाख, पाणीपुरवठा आणि घनकचरा व्यवस्थापनासाठी २५४ कोटी ७९ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला होता. १५ व्या वित्त आयोगाकडून केंद्राने हा निधी २०२०-२१ ते २०२५-२६ या कालावधीसाठी मंजूर केला आहे. यापैकी प्रत्यक्षात हवा प्रदूषण रोखण्यासाठी आतापर्यंत १६२ कोटी, रुपयांचा निधी मिळालेला असून ११९ कोटी रुपयांचा निधी अद्याप प्रलंबित आहे.

पाणीपुरवठा सुधारणांसाठी आतापर्यंत २५४ कोटी रुपयांचा निधी मिळाला असला, तरी आणखी १८८ कोटी रुपयांचा निधी मिळालेला नाही. निवडणुका रखडल्याने हा निधी मिळण्यास अडचणी येत होत्या. मार्च २०२६ पर्यंत निधी मिळण्याची मुदत असल्याने महापालिकेने यासाठी हालचाली सुरू केल्या आहेत. तातडीने याचा प्रस्ताव तयार करून केंद्राकडे पाठविला जाणार असल्याचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी सांगितले. मार्च महिन्यात हा निधी मिळण्याची शक्यता असून, यामुळे विकासकामांना चालना मिळेल, असेही पृथ्वीराज यांनी स्पष्ट केले.

# पिंपरी-चिंचवडमध्ये राज्यातील पहिले ड्रोन क्लस्टर

## मराठा चेंबर ऑफ कॉमर्स उद्योग विभागाकडे पाठपुरावा करणार!

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवडमध्ये औद्योगिक क्षेत्राला नवे बळ देणारा एक महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबवण्यात येणार आहे. मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चर (एमसीसीआयए) राज्यातील पहिले ड्रोन क्लस्टर तसेच खाद्यप्रक्रिया तंत्रज्ञान क्लस्टर उभारण्याचे पुढाकार घेतले आहे.**






“ पिंपरी-चिंचवडमध्ये राज्यातील पहिले ड्रोन क्लस्टर व खाद्यप्रक्रिया तंत्रज्ञान क्लस्टर उभारणे हे औद्योगिक क्षेत्रासाठी मोठा टप्पा ठरणार आहे. यामुळे लघु व सूक्ष्म उद्योगांना नवसंभावना मिळतील, रोजगार निर्मिती होईल आणि या क्षेत्रातील नवोद्योगांना चालना मिळेल. आम्ही या प्रकल्पाला संपूर्ण पाठबळ देण्याची भूमिका घेतली आहे. ड्रोन उद्योग क्षेत्रातील स्थानिक उद्योजकांसाठी हे सुवर्णसंधी ठरेल.

– **महेश लांडगे,** आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

पिंपरी-चिंचवडमध्ये औद्योगिक क्षेत्राला नवे बळ देणारा एक महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबवण्यात येणार आहे. मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चर (एमसीसीआयए) राज्यातील पहिले ड्रोन क्लस्टर तसेच खाद्यप्रक्रिया तंत्रज्ञान क्लस्टर उभारण्याचे पुढाकार घेतले आहे.

### हडपसरमध्ये खाद्यप्रक्रिया तंत्रज्ञान क्लस्टर

हडपसर येथील चेंबरच्या कार्यालयात उभारले जाणारे खाद्यप्रक्रिया तंत्रज्ञान क्लस्टर कृषी व अन्नप्रक्रिया उद्योगांसाठी एकात्मिक सुविधा केंद्र ठरेल. गुणवत्ता तपासणी, निर्यातीसाठी प्राथमिक चाचणी आणि तज्ज्ञांचे मार्गदर्शन एकाच छताखाली उपलब्ध करून देणे या क्लस्टरचे उद्दिष्ट आहे. मराठा चेंबरकडून उद्योग विभागाकडे प्रस्ताव सादर झाल्यानंतर, केंद्र सरकारच्या सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्रालयाची अंतिम मंजुरी, निधी वाटप, यंत्रसामुग्रीसाठी निविदा प्रक्रिया, सॉफ्टवेअर व मनुष्यबळाची व्यवस्था व तज्ज्ञांची निवड अशा टप्प्यांनंतर प्रकल्पाला सुरूवात मिळेल. एमसीसीआयएच्या मते, हा प्रकल्प राज्यातील लघु व सूक्ष्म उद्योगांसाठी नवीन वाटा शोधण्यास मोठा हातभार लावणार आहे.

### ड्रोन क्लस्टर म्हणजे काय?

पिंपरी औद्योगिक वसाहतीत उभारले जाणारे ड्रोन क्लस्टर हे ड्रोन आणि त्याच्या सुट्या भागांसाठी आवश्यक आरेखन, संशोधन, चाचणी व संबंधित तंत्रज्ञानाशी निगडित उद्योगांना एकाच ठिकाणी सुविधा उपलब्ध करून देईल. संरक्षण, कृषी, आपत्ती व्यवस्थापन, सर्वेक्षण आणि वाहतूक क्षेत्रातील ड्रोन वापर वाढत असल्यामुळे या क्लस्टरमुळे राज्यातील ड्रोन उद्योगांना महत्त्वपूर्ण चालना मिळणार आहे.

# पिंपरी ते निगडी मेट्रो “सुसाट” ; महामेट्रोचे नियोजन

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपळे सौदागरच्या झिंजूर्डे मळा परिसरात सुरू असलेल्या १८ मीटर रुंदीच्या रस्ता काँक्रिटीकरण कामाची पाहणी भाजपाचे शहराध्यक्ष आणि नगरसेवक शत्रुघ्न (बापु) काटे यांनी नुकतीच केली. यावेळी नगरसेविका कुंदाताई भिसे आणि नगरसेविका अनिताताई काटे यांच्यासह कामाच्या प्रगतीची सखोल पाहणी करण्यात आली.**



महामेट्रोने पहिल्या टप्प्यातील मार्गिकांच्या विस्तारीकरणाचे काम दुसऱ्या टप्प्यात हाती घेतले आहे. त्यानुसार, स्वारगेट ते पीसीएमसी या मार्गिकेचा निगडीपर्यंत विस्तार करण्याबाबत महामेट्रोकडून सविस्तर प्रकल्प आराखडा



(डीपीआर) तयार करण्यात आला होता. राज्य सरकारने फेब्रुवारी २०२१ मध्ये डीपीआरला मंजुरी दिली. त्यानंतर २०२३ मध्ये केंद्रीय मंत्रिमंडळाने आणि सार्वजनिक गुंतवणूक मंडळाने (पीआयबी) सुमारे एक हजार ४८ कोटी रुपयांच्या खर्चाच्या प्रस्तावाला अंतिम मंजुरी दिली. ४.४१ किलोमीटर लांबीच्या मार्गिकेवर चिंचवड, आकुर्डी, निगडी आणि भक्ती-शक्ती ही चार उन्नत स्थानके मंजूर करण्यात आली.

महामेट्रोने या स्थानकांची संरचना, इलेक्ट्रिक पुरवठा, सरकते जिने, उद्वाहन, ई अँड एम यंत्रणा आणि इतर तांत्रिक सुविधांच्या कामासाठी निविदा प्रक्रिया राबवली होती. २९ ऑगस्ट २०२५ रोजी तांत्रिक निविदा उघडण्यात आल्या. यामध्ये एकाच कंपनीने बोली सादर केली होती. २ सप्टेंबर रोजी आर्थिक निविदा उघडल्या आल्या आणि १२ फेब्रुवारी रोजी आर्थिक मूल्यांकन पूर्ण झाल्यानंतर कोलोसस इन्फ्रा प्रोजेक्ट्सची बोली सर्वांत कमी असल्याने या कंपनीशी करार जाहीर करण्यात आला आहे, असे महामेट्रोकडून सांगण्यात आले.

### या प्रवाशांना फायदा

सध्या पीसीएमसी ते स्वारगेटपर्यंत १७.४ किलोमीटर लांबीची ‘पर्पल लाइन’ कार्यरत आहे. यामध्ये १४ स्थानकांचा समावेश असून, निगडीपर्यंतच्या विस्तारामुळे पिंपरी-चिंचवड आणि निगडी भागातील प्रवाशांना मेट्रोची थेट मध्यवर्ती भागापर्यंत सुलभ प्रवासाची सुविधा मिळणार आहे. शहरातील वाहतूक कोंडी कमी होण्यास आणि सार्वजनिक वाहतुकीला चालना मिळण्यास मदत होणार आहे. तसेच प्रदूषणमुक्तीकडेही वाटचाल होणार असल्याचे महामेट्रोकडून सांगण्यात आले.

# ही जीवितहानी कधी थांबेल?



भूमिका

**मुंबईतील मुलुंड पश्चिमेतील एल.बी.एस. मार्गावर शनिवारी घडलेली दुर्घटना ही केवळ अपघात नव्हती, तर व्यवस्थेच्या निष्काळजीपणाचे भीषण उदाहरण होती. वडाळा–ठाणे मेट्रो लाइन-४ च्या उभारणाधीन पुलाचा सुमारे ६ बाय ४ फूट काँक्रीटचा तुकडा अचानक कोसळून एका ऑटोरिक्षा आणि कारवर पडला.**



ऑटोरिक्षा चालक रामधनी यादव (४६) यांचा जागीच मृत्यू झाला, तर तिघे गंभीर जखमी झाले. धक्कादायक बाब म्हणजे हा भाग फक्त एक दिवस आधी बसवण्यात आला होता आणि घटनास्थळी पर्यवेक्षक नव्हता. सोशल मीडियावर आधीच पिलरमधील भेगांचे फोटो आणि व्हिडिओ समोर आले होते, तरीही दखल घेतली गेली नाही.

दुर्घटनेनंतर नेहमीप्रमाणे दंड, अटक आणि चौकशीची घोषणा झाली. कंत्राटदार रिलायन्स इन्फ्रा अस्ताल्डी आणि उपकंत्राटदाराला ५ कोटी, तर सल्लागाराला १ कोटी दंड ठोठावण्यात आला. काही अधिकाऱ्यांना अटक आणि निलंबन करण्यात आले, तसेच संपूर्ण लाइन-४ वर सेफ्टी ऑडिटचे आदेश देण्यात आले. मात्र हजारो कोटींच्या प्रकल्पांमध्ये असे दंड ‘उंटाच्या तोंडात जीरा’ ठरतात, हे वास्तव आहे. दुर्घटनेनंतरची कारवाई लोकांचा रोष शांत करण्यापुरतीच वाटते.

ही एकच घटना नाही. महाराष्ट्रात आणि देशभरात अशा दुर्घटना वारंवार घडत आहेत. २०१६ मधील महाड पूल दुर्घटना, २०२३ मधील चिपळूण उड्डाणपूल पिलर कोसळणे, २०२५ मधील पुण्यातील इंद्रायणी पूल कोसळणे तर देशपातळीवर मोरबी केबल ब्रिज दुर्घटना, बंगळुरू मेट्रो पिलर कोसळणे आणि चेन्नई मेट्रो गर्डर अपघात. या सर्व घटनांचे समान सूत्र म्हणजे विकासाच्या घाईत सुरक्षा दुय्यम ठरणे.

तज्ज्ञांच्या मते, एल-१ म्हणजे सर्वात कमी बोली पद्धती ही मोठी समस्या आहे. कंत्राटदार कमी खर्चात काम पूर्ण करण्याच्या दबावाखाली गुणवत्ता आणि सुरक्षा तडजोड करतात. सल्लागार कागदोपत्री राहतात, तर साइटवरील पर्यवेक्षण अपुरे असते. वारंवार नियम मोडणाऱ्या कंपन्यांना पुन्हा काम मिळते, यामुळे जबाबदारीची साखळी तुटलेली दिसते. यात भ्रष्टाचाराची शक्यता नाकारता येत नाही. प्रामाणिक अधिकारी आवाज उठवण्याऐवजी बदलीच्या भीतीने गप्प बसतात, हीदेखील कटू वस्तुस्थिती आहे.

या पार्श्वभूमीवर ठोस आणि दीर्घकालीन उपायांची गरज आहे. सर्व मोठ्या पायाभूत प्रकल्पांवर स्वतंत्र थर्ड-पार्टी स्ट्रक्चरल ऑडिट अनिवार्य करणे, वारंवार उल्लंघन करणाऱ्या कंत्राटदारांना कायमचे ब्लॅकलिस्ट करणे आणि काम सुरू असताना खालील वाहतूक पूर्णपणे बंद ठेवणे आवश्यक आहे. २४X७ व्हिडिओ मॉनिटरिंग, स्वतंत्र सेफ्टी ऑफिसर आणि गुणवत्ता-आधारित निविदा प्रक्रिया लागू केली पाहिजे. गंभीर आरोपांवर स्वतंत्र चौकशी यंत्रणा उभी करणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

मुलुंडची घटना एका कुटुंबाचा आधार हिरावून नेणारी असली तरी ती आपल्या विकास मॉडेलचे अपयश उघड करते. विकास आवश्यक आहे, पण तो जीवघेणा नसावा. जबाबदारी, पारदर्शकता आणि मानवी जीवाला सर्वोच्च प्राधान्य दिले नाही, तर अशा दुर्घटना पुन्हा घडत राहतील. प्रश्न एका अपघाताचा नाही; प्रश्न आहे, आपण अजून किती जीव गमावल्यावर जागे होणार?

## प्रासंगिक »

### निर्णय क्षमता

***अर्थशास्त्रात एक कथा सांगितली जाते. बुर्बेन्स नावाच्या गृहस्थांचे एक गाढव होते. त्यांचे एक भले मोठे शेत होते. दोन्ही बाजुंना भरपूर गवत असणारी एक पायवाट त्या शेतातून बाहेर पडत होती.***

सारे कसे सुखात चालले होते. एकदा हा बुर्बेन्स काही कामानिमित्त महिनाभर परगावी जाणार होता. त्याने विचार केला की, गाढवाच्या खाण्याची व्यवस्था करण्या-ची गरज काय? गड्याने जरी त्याच्याकडे दुर्लक्ष केले तरी ते गाढव रस्त्याच्या दुतर्फा असणारे हिरवेगार गवत खाऊन सहज जगेल. बुर्बेन्स गावी गेला. महिनाभरानंतर परतला. पाहतो तर काय? गाढव मरून पडलेले होते. असे कसे झाले? याचा विचार त्याच्या मनात सुरू झाला. एवढे गवत असताना ते गाढव उपाशीपोटी का राहिला असावे? त्याला कळेना. झाले होते असे, की गाढवाचा निश्चय होत नव्हता, की कोणत्या बाजूचे गवत प्रथम खावे? या बाजूचे की त्या बाजूचे? असे करता करता गाढवाने कुठलेच गवत खाल्ले नाही आणि त्याचा भूकबळी पडला!

तात्पर्य :

निर्णय क्षमतेअभावी नुकसान ठरलेले असते.

देशात एकीकडे आर्थिक विषमता वाढत असताना दुसरीकडे सत्ताधारी आणि विरोधक यांच्यातील दरीही वेगाने रुंदावत असल्याचे चित्र दिसत आहे. लोकसभा अध्यक्षांविरुद्ध विरोधी पक्षांनी आणलेला अविश्वास प्रस्ताव ही त्याची ठळक झलक मानली जाते.

## सत्ताधारी-विरोधक यांच्यातील खाई वाढू लागली



हा प्रस्ताव पारित होण्याची शक्यता कमी असली तरी संसदीय व्यवस्थेतील विश्वास कमी होत असल्याचे संकेत त्यातून मिळतात. विरोधकांचा मुख्य आरोप असा आहे की, सभागृहात सत्ताधाऱ्यांना मोकळीक दिली जाते, तर विरोधकांना बोलण्यावर बंधने येतात. विशेषतः विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना मत मांडताना अडथळे आणले जात असल्याची भावना व्यक्त केली जात आहे. जनरल मनोज नरवणे यांच्या अप्रकाशित पुस्तकातील मुद्दे सभागृहात मांडण्यावरून निर्माण झालेल्या वादाने वातावरण अधिक तापले. या प्रकरणामुळे सत्ताधारी-विरोधक संघर्ष आणखी तीव्र झाल्याचे दिसते. या घडामोडींना व्यापक राजकीय अर्थही दिला जात आहे. काहींच्या मते, या संघर्षातून राहुल गांधी यांची प्रतिमा अधिक ठळक होत आहे, तर काही जण सरकारने वाद लवकर मिटवावा असा सल्ला देत आहेत. मात्र सत्ताधाऱ्यांकडून विरोधकांकडे ‘प्रतिस्पर्धी’ नव्हे तर ‘शत्रू’ म्हणून पाहिले जात असल्याची भावना वाढत असल्याने लोकशाही मूल्यांबद्दल चिंता व्यक्त केली जात आहे.

राज्यसभेतही यापूर्वी अशाच प्रकारचे वाद घडले होते. तत्कालीन सभापतींविरुद्ध अविश्वास प्रस्ताव, त्यानंतरचा अचानक राजीनामा आणि निर्माण झालेले गूढ यामुळे संसदीय परंपरांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले. लोकसभेत उपसभापती पद दीर्घकाळ रिक्त ठेवले जाणे आणि परंपरेनुसार विरोधकांना मिळणाऱ्या प्रतिनिधित्वाबाबत मौन राखले जाणे, यामुळे तणाव अधिक वाढल्याचे दिसते.

दरम्यान, डिजिटल माध्यमांवर नियंत्रण वाढवण्याच्या हालचालींनीही वाद अधिक गडद केला आहे. तीन तासांत आक्षेपार्ह मजकूर हटवण्याच्या नव्या नियमांमुळे अभिव्यक्ती स्वातंत्र्याबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. पारंपरिक माध्यमांवर सरकारी प्रभाव वाढत असल्याची टीका होत असताना डिजिटल माध्यमांचे महत्त्व वाढत असल्याची मते पुढे येत आहेत.

एकूणच, सत्ताधारी आणि विरोधक यांच्यातील वाढती खाई ही लोकशाहीसाठी धोक्याची घंटा मानली जात आहे. मतभेद असले तरी संवाद, परंपरा आणि परस्पर आदर टिकवणे आवश्यक आहे. अन्यथा ही दरी आणखी रुंदावत जाऊन संसदीय लोकशाहीच्या मूलभूत मूल्यांनाच तडा जाऊ शकतो.

## ।। अभंगवाणी ।।



संतांच्या धीक्कारें अमंगळ जिणें ।
विश्वशत्रु तेणें सांडी परि ॥१॥

कुळ आणि रूप वांयां संवसार ।
गेला भरतारी मोकलितां ॥धृ.॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# घात की अपघात कळाल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही!

## अजितदादांच्या विमानातील ब्लॅक बॉक्स बंद होता का? रोहित पवार आक्रमक

**महाईन्यूज । पुणे**

**अजित पवारांच्या विमान अपघाताप्रकरणी अनेक उलट सुलट चर्चा सुरू आहे. हा अपघातच होता की घातपात होत यावर विविध शंका उपस्थित केल्या जात आहेत. दरम्यान, विमानातील तांत्रिक अडचणींची माहिती देणाऱ्या ब्लॅक बॉक्सबाबतही अनेक खुलासे आता समोर येऊ लागले आहेत. दरम्यान, यावर आमदार रोहित पवार यांनी आता भाष्य केलं आहे. त्यांनी आज माध्यमांशी संवाद साधला.**



अजित पवारांच्या विमानातील ब्लॅक बॉक्स जळून खाक झाला असल्याचा दावा काही माध्यमांनी सूत्रांच्या हवाल्याने केला आहे. तसंच, तपासणीसाठी हे ब्लॅक बॉक्स आता विदेशात पाठवला जाणार आहे, असंही म्हटलं जातंय. दरम्यान, यावर रोहित पवारांनीही आता शंका उपस्थित केलीय. ते म्हणाले, "ब्लॅक बॉक्स बंद ठेवता येत नाही. अतुल लोंढे म्हणतात त्याप्रमाणे ब्लॅक बॉक्स बंद केला असेल तर खऱ्या गोष्टी बाहेर येऊ नये म्हणून आता एक कारण लोकांमध्ये पेरलं जात आहे. ब्लॅक बॉक्स बंद करता येत नाही. पण ब्लॅक बॉक्स बंद असल्यामुळे चौकशी करता येत नसेल तर मी म्हणतोय त्याप्रमाणे हा अपघात नव्हता, हा घातच होता हे क्लिअर होईल."

तसंच, ते म्हणाले, "अजितदादांची किंमत सर्वसामान्य नागरिकांना समजली पण अजून तपास यंत्रणांना मात्र समजलेली दिसत नाही. दुर्दैवी अपघातानंतर २० दिवस झाले पण अजूनही तपासाला वेग आला नाही. केवळ VSR कंपनीला पुरावे नष्ट करता यावे म्हणून तर उशीर होत नाही ना? की कंपनीला कुणाचा वरदहस्त आहे, हा प्रश्न सामान्य नागरिकांना पडला आहे. आज ब्लॅक बॉक्स खराब झाल्याबाबत जी काही माहिती समोर येत आहे त्यावरून मी ५ दिवसांपूर्वी वर्तवलेली शक्यता खरी होताना दिसत आहे. असो, आम्ही मात्र दादांचा अपघात की घात याचे उत्तर मिळवल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही! दोन दिवसात पुन्हा पत्रकार परिषदेत भेटू." असे रोहित पवार म्हणाले




### रोहित पवारांचा DGCA वरही संशय?

"स्व.दादांच्या दुर्दैवी अपघाताचा आज विसावा दिवस असून अद्यापही DGCA कडून प्राथमिक चौकशी अहवाल आलेला नाही, तसेच सर्व नियमांचे उल्लंघन करत विमाने चालवणाऱ्या VSR कंपनीविरोधात देखील काहीही कारवाई अद्यापर्यंत झालेली नाही. परिणामी शंका अधिक बळावत चालल्या आहेत. त्यामुळे DGCA ने लवकरात लवकर प्राथमिक चौकशी अहवाल द्यावा तसेच VSR वर योग्य ती कारवाई करावी", असंही रोहित पवार म्हणाले.

# महात्मा गांधींवरील टीकेवरून राजकारण तापले

**महाईन्यूज । नागपूर**

**राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या समाधीवर आजही ईश्वर, अल्ला तेरो नाम ही प्रार्थना वाजते. मात्र, हे मुळ गाणे पंडीत लक्ष्मचार्य यांनी लिहले होते. या गाण्यात कुठेही ईश्वर, अल्ला असा उल्लेखही नाही. मात्र, त्या गाण्याची चोरी करून महात्मा गांधी यांनी अल्ला हा शब्द घुसवला. ते या देशाचे राष्ट्रपीता कसे होऊ शकतात, अशी टीका ज्येष्ठ पत्रकार पुष्पेंद्र कुलश्रेष्ठ यांनी केली होती. यावर आता चांगलेच राजकारण तापले आहे.**



काँग्रेस आणि गांधीवादी नेत्यांनी कुलश्रेष्ठ यांचा समाचार घेतला आहे. तसेच भाजप आणि आयोजकांवर टीका केली आहे. काँग्रेसचे प्रवक्ते अतुल लोंढे यांनी लोकसत्ताशी बोलताना सांगितले की, महात्मा गांधी यांनी ईश्वर अल्ला तेरो नाम ही प्रार्थना एकतेसाठी सांगितली होती. देशात सर्व धर्मांमध्ये समानता राहावी म्हणून त्यांनी ही प्रार्थना सर्वांना सांगितली. याशिवाय महात्मा गांधींना राष्ट्रपिता हे नाव त्यांनी स्वतः दिले नसून सुभाषचंद्र बोस आणि रवींद्रनाथ टागोर यांनी दिलेले आहे. त्यामुळे कुलश्रेष्ठ सारखा व्यक्ती जर राष्ट्रपिता या पदवीवरून टीका करत असेल तर तो एक प्रकारे सुभाषचंद्र बोस आणि रवींद्रनाथ टागोर यांचा अपमान करत असल्याचा आरोपही अतुल लोंढे यांनी केला. भारत पाकिस्तान फाळणीसाठी महात्मा गांधींना दोष देत असतील तर ही त्यांची फार मोठी चुकी आहे. कारण देशाच्या फाळणीसाठी पाचही बोटं ही राष्ट्रीय स्वयंसेवक संघाकडे जातात. हिंदू राष्ट्राचा ठराव सर्वात आधी स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी मांडला होता.

स्वातंत्र्यपूर्व काळात, १९४० च्या दशकात (१९४१-४२ च्या सुमारास) हिंदू महासभेचे नेते डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी बंगाल प्रांतात मुस्लिम लीगसोबत युतीचे सरकार स्थापन केले होते. या सरकारमध्ये, अ. कृ. फजलुल हक मुख्यमंत्री होते आणि मुखर्जी यांनी उपमुख्यमंत्रिपदाची जबाबदारी सांभाळली होती, ज्याचा उद्देश त्यावेळच्या राजकारणात मुस्लिम लीगच्या प्रभावाला नियंत्रित करणे हा होता. त्यामुळे विभाजनासाठी महात्मा गांधींना दोष देताना कुलश्रेष्ठ यांनी इतिहास तपासावा असा सल्लाही लोंढे यांनी दिला. महात्मा गांधी हे विभाजनाच्या विरोधात होते. माझ्या मृतदेहावर विभाजन होईल असे गांधी बोलले होते. याचे उत्तर कुलश्रेष्ठ कधी देणार, नथुराम गोडसे याने गांधींची हत्या केली याचे उत्तर कुलश्रेष्ठ यांनी द्यावे असेही लोंढे म्हणाले.

### गांधींनी कार्यक्रम आयोजित करणे दुर्दैवी.

सकल हिंदू समाज संमेलनानिमित्त नागपूरमध्ये आयोजित व्याख्यानात पुष्पेंद्र कुलश्रेष्ठ यांनी महात्मा गांधी यांच्यावर टीका केली. या संमेलनाचे आयोजनात तुषार गांधी यांचा मोठा वाटा होता. गांधींवर टीका होणाऱ्या अशा एका कार्यक्रमाचे आयोजन गांधींनीच करावे हे दुर्दैव आहे अशी टीकाही अतुल लोंढे यांनी केली.

# ई-कॉमर्समध्ये AI क्रांती; ६ कोटी व्यापाऱ्यांना फायदा

## साहिल गोयल यांचा विश्वास: तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे व्यवसायातील अडचणी कमी

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**भारतात ई-कॉमर्सचा (ऑनलाईन व्यापार) विस्तार करण्यासाठी आर्टिफिशियल इंटेलिजेंस (AI) तंत्रज्ञान खूप मदत करेल. शिप्रॉकेटमुळे आतापर्यंत सुमारे ४ लाख व्यवसाय ऑनलाईन सुरू झाले आहेत. यामुळे देशातील सूक्ष्म आणि लघू उद्योगातील (MSMES) तब्बल ६ कोटी छोट्या व्यापाऱ्यांना ऑनलाईन व्यवसायाची संधी उपलब्ध होईल.**




### सर्व कंपन्यांची माहिती एकाच ठिकाणी जमा करावी

"ऑनलाईन व्यापार, कुरिअर आणि पेमेंट क्षेत्रातील सर्व कंपन्यांनी आपली माहिती (डेटा) एकाच ठिकाणी जमा करावी. या सामायिक माहितीचा वापर करून आपण भारतासाठी अधिक चांगले, सुरक्षित आणि शक्तिशाली तंत्रज्ञान बनवू शकतो, असेही गोयल यांनी यावेळी स्पष्ट केले.

तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे व्यवसायातील विविध अडचणी लक्षणीयरीत्या कमी होतील आणि देशभरातील छोटे व्यापारी अधिक प्रभावीपणे डिजिटल अर्थव्यवस्थेशी जोडले जातील, असा ठाम विश्वास शिप्रॉकेट कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) साहिल गोयल यांनी व्यक्त केला. इंडिया एआय इम्पॅक्ट समिटमध्ये 'एएनआय'शी संवाद साधताना त्यांनी याबाबत सविस्तर भूमिका मांडली.

गोयल म्हणाले की, शिप्रॉकेटने आतापर्यंत सुमारे चार लाख व्यवसायांना ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर यशस्वीपणे आणले आहे. मात्र, भारतात अजूनही तब्बल सहा कोटी सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग (MSMES) क्षेत्रातील व्यापारी आहेत, ज्यांना ऑनलाइन व्यवसायाच्या मुख्य प्रवाहात सहभागी व्हायचे आहे. खऱ्या अर्थाने डिजिटल क्रांती तेव्हाच यशस्वी ठरेल, जेव्हा देशाच्या कोणत्याही भागातील व्यापाऱ्याला देशाच्या दुसऱ्या टोकावरील ग्राहकांपर्यंत सहज, जलद आणि विश्वासार्ह पद्धतीने पोहोचता येईल. उदाहरण देताना त्यांनी स्पष्ट केले की, गुवाहाटीमधील एखाद्या व्यापाऱ्याला काश्मीरमधील ग्राहकाला काही मिनिटांत आपला माल विक्रीसाठी उपलब्ध करून देता आला पाहिजे. आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI) तंत्रज्ञानामुळे हे शक्य होणार आहे.

### AI मुळे नोकऱ्या सुरक्षित.

"तंत्रज्ञान सोपे झाल्यामुळे नवनवीन लोक व्यवसायात येतील, ज्यामुळे लॉजिस्टिक्स (माल वाहतूक) आणि गोदामांच्या कामात मोठ्या प्रमाणावर नोकऱ्या निर्माण होतील. AI (कृत्रिम बुद्धिमत्ता) काही कष्टाची किंवा एकाच प्रकारची कामे स्वतः करेल, पण यामुळे कामगारांच्या नोकऱ्या जाणार नाहीत. उलट, त्यांचे ५० टक्के काम हलके होईल. त्यामुळे कर्मचाऱ्यांना अन्य महत्त्वाची कामे करण्यासाठी वेळ मिळेल. परिणामी, कामगारांची क्षमता वाढेल आणि कंपन्यांचा फायदाही होईल," असा विश्वासही गोयल यांनी व्यक्त केला.

# दहशतवादी अबू सालेमच्या सुटकेची याचिका फेटाळली

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**भारत आणि पोर्तुगीज सरकारांमध्ये झालेल्या प्रत्यार्पण कराराच्या अटींनुसार मुदतपूर्व सुटकेची मागणी करणारा दहशतवादी अबू सालेमची याचिका सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी (दि.१६) फेटाळली. १९९३ च्या मुंबई बॉम्बस्फोट प्रकरणात त्याला दहशतवादी आणि विध्वंसक कारवाया (टाडा) कायद्यांतर्गत दोषी ठरवण्यात आले होते. तथापि, न्यायालयाने त्याला उच्च न्यायालयात जाण्याची मुभा दिली.**





अबू सालेमने आपल्या सुटकेसाठी दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी करण्यास न्यायालयाने ठाम नकार दिला. न्यायालयाने आपल्या निरीक्षणात स्पष्टपणे नमूद केले की सालेमने समाजाच्या कल्याणासाठी किंवा सार्वजनिक हितासाठी कोणतेही उल्लेखनीय, सकारात्मक किंवा समाजोपयोगी कार्य केलेले नाही. तसेच तो दहशतवाद प्रतिबंधक कायदा (टाडा) अंतर्गत दोषी ठरलेला असून त्याच्यावर गंभीर गुन्ह्यांचे आरोप सिद्ध झालेले आहेत, ही बाबही न्यायालयाने अधोरेखित केली.

न्यायालयाने पुढे असेही स्पष्ट केले की मुंबई उच्च न्यायालयाने यापूर्वी केवळ अंतरिम दिलासा देण्यास नकार दिला आहे. त्यामुळे या प्रकरणात अंतिम निर्णय किंवा कोणताही कायमस्वरूपी दिलासा मिळवण्यासाठी सालेमने उच्च न्यायालयातच सविस्तर अंतिम युक्तिवाद मांडणे आवश्यक आहे. सर्वोच्च न्यायालयाने या टप्प्यावर हस्तक्षेप करण्यास अनुकूलता दर्शवली नाही.

आपल्या याचिकेत सालेमने असा दावा केला होता की १९९३ च्या मुंबई बॉम्बस्फोट प्रकरणात ठोठावण्यात आलेली २५ वर्षांची शिक्षा पूर्ण केल्यानंतरही त्याला सुमारे दहा महिन्यांहून अधिक काळ तथाकथित "बेकायदेशीर कोठडीत" ठेवण्यात आले. त्यानुसार, २५ वर्षांचा कारावास पूर्ण झाल्यानंतर त्याची तात्काळ सुटका होणे अपेक्षित होते, असे त्याचे म्हणणे होते.

अबू सालेमला प्रदीर्घ आणि गुंतागुंतीच्या आंतरराष्ट्रीय कायदेशीर प्रक्रियेनंतर ११ नोव्हेंबर २००५ रोजी पोर्तुगालमधून भारतात प्रत्यार्पण करण्यात आले होते. त्यानंतर त्याच्यावर न्यायालयीन प्रक्रिया पार पडली आणि त्याला शिक्षा सुनावण्यात आली. याचिकेत त्याने जुलै २००२ मधील सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा आधार घेतला.

हा निर्णय भारत आणि पोर्तुगाल यांच्यातील प्रत्यार्पण करारावर आधारित असल्याचे सांगत, २५ वर्षांचा तुरुंगवास पूर्ण झाल्यानंतर त्याला मुक्त करण्यात यावे, असे त्याने नमूद केले. मात्र, महाराष्ट्र राज्य सरकारने न्यायालयात ठामपणे युक्तिवाद केला की सालेमने अद्याप संपूर्ण २५ वर्षांची शिक्षा भोगलेली नाही. त्यामुळे त्याच्या सुटकेची मागणी ग्राह्य धरता येणार नाही, असे राज्याचे म्हणणे होते.

एकूणच, न्यायालयाने या टप्प्यावर कोणताही दिलासा देण्यास नकार देत, प्रकरणाचा अंतिम निकाल लागेपर्यंत संबंधित न्यायालयीन प्रक्रियाच पुढे सुरू राहील, असे स्पष्ट केले.

## प्रियदर्शिनीला हवाय असा मुलगा

प्रियदर्शिनी मराठी सिनेसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री आहे. तिने आतापर्यंत अनेक मराठी चित्रपटांत मुख्य नायिकेच्या भूमिका साकारल्या आहेत. परंतु, ती खऱ्या अर्थाने प्रसिद्धीझोतात आली ते 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' या लोकप्रिय कार्यक्रमातून. प्रियदर्शिनीने तिच्या विनोदी शैलीने प्रेक्षकांचं मनोरंजन केलं आहे. प्रियदर्शिनी सोशल मीडियावर खूप सक्रिय असते आणि अनेकदा तिच्या दैनंदिन जीवनातील घडामोडी ती यामार्फत शेअर करत असते. प्रियदर्शिनी मुलाखतींमधूनही अनेकदा तिच्या व्यावसायिक व खासगी आयुष्याबद्दल बोलताना दिसते. अशातच आता तिने तिच्या ब्रेकअपबद्दल आणि तिला किती पगार असलेल्या मुलाशी लग्न करायचं आहे याबद्दल सांगितलं आहे. 'बिग बॉस १९'फेम प्रणित मोरेच्या शोमध्ये तिने याबद्दल सांगितलं आहे. प्रियदर्शिनी नेमकं काय म्हणाली याबद्दल सविस्तर जाणून घेऊयात...प्रियदर्शिनीला तुला इन्स्टाग्रामवर मुलं लग्नासाठी मागणी घालतात का असं विचारल्यानंतर ती म्हणाली, "हो, मला मेलवर मागणी घालतात. ३-४ वर्षांपूर्वी एका माणसाने मला त्याचा अख्खा बायोडेटा पाठवला आणि तो ३५ वर्षांचा होता तेव्हा. माझं वय फक्त २४-२५ होतं. त्याने मला माझं घर इथे आहे, एवढी प्रॉपर्टी आहे, लग्नानंतर आपण इथे राहू, इथे लग्न करू वगैरे सगळं सविस्तर सांगितलं." प्रियदर्शिनी पुढे म्हणाली, "काय नोकरी करतो, कुठे गुंतवणूक आहे सगळं सांगितलेलं." पुढे तिला किती पगार होता त्याला असं विचारल्यानंतर ती म्हणाली, "काहीतरी ४०-५० हजारांची नोकरी होती त्या माणसाला." म्हणून तू त्याला सोडलंस ना असं विचारल्यानंतर प्रियदर्शिनी म्हणाली, "हो खरंतर." यानंतर तिला किती पगार असता तर हो म्हणाली असती असं विचारल्यानंतर ती म्हणाली, "महिन्याला ३५ लाख वगैरे कमावणारा हवा." दरम्यान, ब्रेकअपबद्दल प्रियदर्शिनीने सांगितलं की त्याला लग्न करायचं होतं लवकर, कारण तो माझ्यापेक्षा वयाने खूपच मोठा होता आणि मला काही घाई नव्हती, त्यामुळे आमच्यामध्ये वाद झाले आणि पुढे ते नातं टिकलं नाही."



## विजय-रश्मिका यांच्या शाही लग्नाची चर्चा

साऊथ सिनेमातील चर्चेत असलेली जोडी विजय देवरकोंडा आणि रश्मिका मंदाना यांच्या लग्नाबाबत सध्या जोरदार चर्चा सुरू आहे.ताज्या रिपोर्टनुसार दोघे 26 फेब्रुवारी रोजी उदयपूरमध्ये शाही पद्धतीने लग्न करणार असल्याची चर्चा आहे. मात्र, याबाबत दोघांकडून कोणतीही अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही.माहितीनुसार, लग्न समारंभ अत्यंत खासगी स्वरूपात होणार असून त्यात फक्त कुटुंबीय आणि जवळचे मित्र उपस्थित राहतील. उदयपूरमधील एका आलिशान महालात साध्या पण रॉयल थीममध्ये सजावट केली जाणार असल्याचे सांगितले जाते. समारंभ पूर्णपणे खाजगी ठेवण्याची तयारी सुरू आहे. उदयपूरमध्ये लग्नानंतर मार्च महिन्यात हैदराबादमध्ये भव्य रिसेप्शन आयोजित केले जाईल, अशीही चर्चा आहे. 4 मार्च रोजी मोठ्या कन्व्हेन्शन सेंटरमध्ये हा कार्यक्रम होऊ शकतो. या रिसेप्शनला साऊथ इंडस्ट्रीतील मोठे कलाकार तसेच बॉलिवूडमधील काही प्रसिद्ध चेहरे उपस्थित राहू शकतात. असेही म्हटले जात आहे की, दोघांनी ऑक्टोबर 2025 मध्ये गुपचूप साखरपुडा केला होता. मात्र या बातमीवरही दोघांनी कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही. एका मोठ्या स्ट्रीमिंग प्लॅटफॉर्मने लग्नाचे विशेष प्रक्षेपण हक्क मिळवण्यासाठी 60 कोटी रुपयांचा प्रस्ताव दिला होता, पण तो त्यांनी नाकारल्याचे सांगितले जाते. हा खास क्षण खासगीच ठेवण्याचा त्यांचा निर्णय असल्याची चर्चा आहे.वर्कफ्रंटबाबत बोलायचे झाल्यास, विजय अलीकडेच 'किंगडम' या चित्रपटात दिसला होता, तर रश्मिकाचा 'द गर्लफ्रेंड' हा चित्रपट प्रदर्शित झाला होता. आता चाहत्यांना उत्सुकता आहे की या चर्चांना अधिकृत शिक्कामोर्तब मिळते की या केवळ अफवा ठरतात.



## रवीना टंडनने 'कुछ कुछ होता है' का नकार दिला होता

कुछ कुछ होता है' हा बॉलीवूडमधील लोकप्रिय चित्रपट आहे. करण जोहर दिग्दर्शित चित्रपटात शाहरुख खान, काजोल आणि राणी मुखर्जी झळकले होते. पण, तुम्हाला माहीत आहे का या चित्रपटात राणीने साकारलेल्या टीनाच्या भूमिकेसाठी आधी रवीना टंडनला विचारणा झालेली. परंतु, तिने ती भूमिका नाकारली होती.'कुछ कुछ होता है' हा काजोल व शाहरुख खानचा लोकप्रिय चित्रपट आहे. त्यामध्ये राणी व सलमान खानही पाहुण्या कलाकारांच्या भूमिकांत पाहायला मिळतात. त्यांच्या भूमिका काजोल व शाहरुखच्या तुलनेत छोट्या असल्या तरी त्यांचे चित्रपटातील सीन व संवाद आजही प्रेक्षकांच्या स्मरणात आहेत. परंतु, यामध्ये राणीच्या जागी रवीना टंडनला विचारणा झालेली. मात्र, करिअरच्या पीकवर असताना तिने या भूमिकेला नकार दिलेला. रवीनाने त्याबद्दल नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत माहिती दिली आहे.रवीना टंडन ९० च्या काळातील बॉलीवूडमधील लोकप्रिय अभिनेत्री होती. इंडस्ट्रीतील अनेक लोकप्रिय अभिनेत्यांसह तिने काम केलं आहे. तिने अनेक चित्रपटांत मुख्य नायिका म्हणून काम केलं आहे. 'मोहरा' या चित्रपटातून तिला प्रचंड लोकप्रियता मिळाली आणि याच चित्रपटातून ती खऱ्या अर्थाने मुख्य नायिका म्हणून नावारूपाला आली, त्यामुळे इंडस्ट्रीत मुख्य नायिका म्हणून ओळख मिळवल्यानंतर तिला पुन्हा दुय्यम भूमिका साकारायच्या नव्हत्या, याबद्दल तिने 'झूम'शी संवाद साधताना सांगितलं आहे. रवीना टंडन म्हणाली, "काही चित्रपटांना नकार देण्यामागे काही कारणं होती. उदाहरणार्थ 'कुछ कुछ होता है.' करण मला नेहमी म्हणतो की, तू माझ्या पहिल्या चित्रपटाला नकार दिलास; पण मीसुद्धा त्याला नेहमी हेच सांगते की मला तुझ्यासोबत काम करायला आवडलं असतं, तू माझा चांगला मित्र आहेस, पण दुर्दैवाने त्यावेळी मी करिअरमध्ये अशा टप्प्यावर होते, जिथे मी दुय्यम भूमिका साकारून पुन्हा सगळं सुरू करू शकत नव्हते."



# मैदानात उतरण्याआधीच पाकिस्तान फेल

## भारत आणि पाकिस्तान यांच्यातील हाय व्हॉल्टेज सामना

**महाईन्यूज । मुंबई**

**भारत आणि पाकिस्तान यांच्यातील हाय व्हॉल्टेज सामना कोलंबोतील आर प्रेमदासा स्टेडियममध्ये पार पडला. या सामन्यातील पहिल्या डावात फलंदाजी करताना भारतीय संघाने १७५ धावांचा डोंगर उभारला होता. या धावांचा पाठलाग करताना पाकिस्तानचा डाव अवघ्या ११४ धावांवर आटोपला. यासह भारतीय संघाने हा सामना ६१ धावांनी आपल्या नावावर केला.**




या सामन्यात भारतीय गोलंदाज आणि फलंदाज चमकले. तर पाकिस्तानच्या खेळाडूंकडून फ्लॉप शो पाहायला मिळाला. दरम्यान या सामन्यानंतर भारताचा माजी खेळाडू आर अश्विनने पाकिस्तानचं नेमकं काय चुकलं याबाबत खुलासा केला आहे.

या सामन्यानंतर आपल्या यूट्यूब चॅनेलवर बोलताना आर अश्विन म्हणाला, "पाकिस्तानने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. आपण झिम्बाब्वे आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील सामना पाहिला होता. या सामन्यात ऑस्ट्रेलियाला १७० धावांचा पाठलाग करणंही जड झालं होतं. आयपीएलमध्ये जर एखाद्या संघाला शेवटच्या १० षटकात १०० धावा करायच्या असतील, तर ते सहज होऊन जातं. पण हे वर्ल्डकपमध्ये होत नाहीये. प्रेमदासा स्टेडियममध्ये तुम्ही १० षटकात १०० धावांचा पाठलाग करू शकत नाही."

तसेच तो पुढे म्हणाला की, "ज्या पद्धतीने भारतीय खेळाडू दबावाचा सामना करतात, ते पाहता भारतीय खेळाडू १०० पटीने उत्तम आहेत. पाकिस्तानचा संघ तितका सक्षम आहे, असं मला मुळीच वाटत नाही. खरं सांगू, तर सलमान अली आघा आणि माईक हेसनच्या नेतृत्वात पाकिस्तानची टेक्निक चांगली झाली आ हे . पण ज्या पद्धतीने त्यांनी सलमान अली आघाच्या पहिल्या षटकाच्या समाप्तीनंतर शाहिन आफ्रिदीला गोलंदाजीला बोलवलं ही सर्वात मोठी चूक होती." या सामन्यात पाकिस्तानने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. भारतीय संघाकडून पहिल्या डावात फलंदाजीसाठी आलेला अभिषेक शर्मा शून्यावर माघारी परतला. त्यानंतर इशान किशनने भारतीय संघाचा डाव सांभाळला. इशानने ७७ धावांची खेळी केली. तर सूर्यकुमार यादवने ३२ धावांची खेळी करून संघाची धावसंख्या १७५ धावांपर्यंत पोहोचवली. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या पाकिस्तानकडून उस्मान खानने सर्वाधिक ४४ धावांची खेळी केली. या खेळीच्या बळावर पाकिस्तानचा डाव ११४ धावांवर आटोपला. यासह भारताने हा सामना ६१ धावांनी आपल्या नावावर केला.

# इंग्लंड अपसेटपासून थोडक्यात बचावला!

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**टी-२० विश्वचषकात इंग्लंडचा संघ सलग दुसऱ्यांदा अपसेटपासून वाचली आहे. इटलीविरूद्ध सामन्यात इंग्लंडने अखेरच्या षटकात विजय मिळवला. स्पर्धेतील पहिल्या सामन्यात नेपाळविरुद्ध शेवटच्या चेंडूवर पराभवापासून थोडक्यात बचावलेल्या इंग्लंडने इटलीचा पराभव केला आहे. शेवटच्या षटकांमध्ये सॅम करनने पुन्हा एकदा उत्कृष्ट गोलंदाजी केली आणि अखेरीस २४ धावांनी विजय नोंदवला. या विजयासह इंग्लंडने सुपर-८ मध्ये धडक मारली आहे.**




कोलकात्यातील ईडन गार्डन्स स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या या सामन्यात, इंग्लंडला अपसेटचा सामना करावा लागणार असं चित्र होतं. नेपाळपासून इंग्लंड वाचला होता पण इटली आता इंग्लंडला पराभूत करेल अशी स्थिती होती. इंग्लंडने प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला तेव्हा मोठी धावसंख्या गाठण्याची अपेक्षा होती. इटलीच्या गोलंदाजांची धुलाई करत इंग्लंडने २०० अधिक धावांचा आकडा गाठला. पण इटलीनेही चांगली फटकेबाजी केली. पण जेमी ओव्हरटनने अखेरचं षटक मेडन टाकत संघाची लाज राखली.

फिल साल्टने संघाला वेगवान सुरुवात करून दिली, त्याने येताच चौकारांची आतिषबाजी केली, परंतु जोस बटलरचा खराब फॉर्म पुन्हा दिसून आला. पण, सॉल्ट बाद झाल्यानंतर इंग्लंडच्या विकेट एकामागून एक पडू लागल्या. तेव्हा सॅम करन आणि विल जॅक्स यांनी संघाचा डाव सावरला. या दोघांनी संघाला १५० धावांच्या पुढे नेलं. करन बाद झाल्यानंतरही, जॅक्सने नाबाद ५३ धावांची खेळी करत आपला प्रभावी फॉर्म कायम ठेवला, त्याने फक्त २१ चेंडूत अर्धशतक झळकावून संघाला २०२ धावांपर्यंत पोहोचवलं. इटलीकडून ग्रँट स्टीवर्ट आणि क्रिशन कलुगामेगे यांनी प्रत्येकी २ विकेट्स घेतल्या.

जोफ्रा आर्चरने त्यानंतर पहिल्याच षटकात दोन विकेट्स घेतल्या आणि त्यामुळे इटलीला मोठे धक्के बसले. संघाने चार षटकांत तीन विकेट्स गमावल्या. पण इंग्लंडला पुन्हा एकदा नवीन संघाच्या अननुभवी फलंदाजांविरुद्ध संघर्ष करावा लागेल याची कल्पनाही केली नसेल. नेपाळच्या फलंदाजांप्रमाणेच, इटलीच्या जस्टिन मोस्का आणि बेन मॅनेंटी यांनी ९२ धावांची स्फोटक भागीदारी करून इंग्लिश गोलंदाजांची धुलाई केली. यामध्ये मॅनेंटीने इटलीसाठी फक्त २२ चेंडूत सर्वात जलद अर्धशतकही केलं. विल जॅक्सने अखेर मॅनेंटीला बाद करून ही भागीदारी मोडली. मॅनेंटीने २५ चेंडूत ६ षटकार व ४ चौकारांसह ६० धावांची खेळी करत बाद झाला. लगेचच मोस्कादेखील ४३ धावांवर आदिल रशीदच्या गोलंदाजीवर बाद झाला. १६व्या षटकात सलग दोन विकेट्स घेणाऱ्या सॅम करनमुळे इटलीचा डाव डगमगताना दिसत होता, पण संघातील इतर फलंदाजांनी वादळी कामगिरी केली. नवीन फलंदाज ग्रँट स्टीवर्टने २३ चेंडूत ५ षटकारांसह ४५ धावांची खेळी केली. त्याने जोफ्रा आर्चरच्या षटकात दोन षटकार आणि त्यानंतर १८ व्या षटकात आदिल रशीदच्या षटकात तीन षटकार मारले. यामुळे इंग्लंडला विश्रांती मिळाली. शेवटच्या दोन षटकांत फक्त ३० धावांची गरज असताना, करनने पुन्हा एकदा सामना फिरवला. त्याने षटकात फक्त पाच धावा दिल्या आणि स्टीवर्टची विकेट घेतली. इटलीचा डाव शेवटच्या चेंडूवर १७८ धावांवर संपला.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज™
epaper.mahaenews.com
ePaper
। मंगळवार ।
दि. 17 फेब्रुवारी 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# धर्मवीर शंभूराजांच्या शौर्यस्मृतींचा बलिदान मास

## हिंदुभूषण स्मारक ट्रस्टतर्फे नियोजन; आजी-माजी पदाधिकाऱ्यांची बैठक

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या शौर्य, त्याग आणि धर्मनिष्ठेच्या स्मरणार्थ दरवर्षी साजरा होणारा बलिदान मास यावेळी १८ फेब्रुवारी ते १८ मार्च २०२६ दरम्यान हिंदुभूषण स्मारक ट्रस्टच्या वतीने पाळण्यात येणार आहे. तसेच, शिव-शंभू विचारांची पिढी घडवण्यासाठी जनजागृती करण्याचा संकल्प करण्यात आला आहे.**



भोसरी विधानसभा मतदार संघातील नवनिर्वाचित नगरसेवक आणि आजी-माजी पदाधिकारी यांच्या उपस्थितीत बलिदान मास जनजागृतीबाबत आढावा बैठक आयोजित करण्यात आली. यावेळी ट्रस्टचे अध्यक्ष व आमदार महेश लांडगे, महापौर रवि लांडगे यांच्यासह ट्रस्टचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. बैठकीत कार्यक्रमांचे नियोजन, जनजागृती मोहिमेची रूपरेषा आणि युवकांसाठी प्रेरणादायी उपक्रम याबाबत सविस्तर चर्चा झाली.

फाल्गुन अमावस्येला (इ.स. १६८९) संभाजी महाराजांनी मुघल बादशाह औरंगजेबाच्या कैदेत अमानुष छळ सहन करत स्वराज्य आणि धर्मासाठी सर्वोच्च बलिदान दिले. संगमेश्वर येथील सरदेसाईंच्या वाड्यात पकडल्यापासून ते भिमा-भामा-इंद्रायणीच्या तीरावर मृत्यूला सामोरे जाण्यापर्यंत त्यांनी दाखवलेले धैर्य व शौर्य आजही प्रेरणादायी ठरते. संभाजी महाराज हे छत्रपती शिवाजी महाराजांचे ज्येष्ठ चिरंजीव आणि मराठा साम्राज्याचे दुसरे छत्रपती होते. त्यांनी मुघलांच्या आक्रमणांना प्रतिकार केला आणि छळ सहन करूनही स्वराज्य व धर्माशी तडजोड केली नाही. या त्यागामुळे त्यांना “धर्मवीर” म्हणून गौरवण्यात आले आहे.

आमदार लांडगे म्हणाले की, युवकांसाठी व्याख्यानमाला, इतिहास स्पर्धा व “धर्मवीर” आदर्शांच्या आधारे त्याग, धैर्य आणि राष्ट्रनिष्ठेचा संदेश प्रसारित केला जातो. सोशल मीडियावर सत्य इतिहास व सकारात्मक संदेश प्रसारित करण्यावर भर देण्यात येणार आहे. बलिदान मास केवळ ऐतिहासिक स्मृती नसून तरुण पिढीला शौर्य, त्याग व कर्तव्यपरायणतेचा मंत्र देणारा महत्त्वाचा काळ आहे. हिंदुभूषण स्मारक ट्रस्टच्या या उपक्रमातून समाजात ऐक्य, संस्कार आणि राष्ट्रभक्तीची जाणीव अधिक दृढ होईल, असा विश्वास आहे.

> “धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या शौर्य, त्याग आणि धर्मनिष्ठेच्या स्मृतीला आपण साजरे करून, युवकांमध्ये राष्ट्रभक्ती आणि समाजोपयोगी भावनेची जाणीव निर्माण करू. बलिदान मास केवळ ऐतिहासिक स्मृती नसून, प्रत्येक मराठी माणसासाठी प्रेरणास्त्रोत आहे. बलिदान मास केवळ ऐतिहासिक स्मृती नाही, तर तरुण पिढीला शौर्य, त्याग व कर्तव्यपरायणतेचा मंत्र देणारा काळ आहे. हिंदुभूषण स्मारक ट्रस्टच्या या उपक्रमातून समाजात ऐक्य, संस्कार आणि राष्ट्रभक्तीची जाणीव अधिक दृढ होईल.यासाठी आम्ही प्रयत्न करीत आहोत.
>
> – महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

### बलिदान मासाचे उद्दिष्ट

इतिहासाची जाणीव व राष्ट्रनिष्ठा दृढ करणे. युवकांना शौर्य, त्याग आणि कर्तव्यपरायणतेची प्रेरणा देणे. सामाजिक ऐक्य व समाजोपयोगी कार्यांना चालना देणे, असा उद्देश आहे. तसेच, शैक्षणिक आणि सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. यामध्ये अभिवादन, व्याख्यानमाला व इतिहासपर कार्यक्रम, रक्तदान शिबिर, वृक्षारोपण व अन्नदान, विद्यार्थ्यांसाठी निबंध/भाषण स्पर्धा, माहितीपर प्रदर्शने व जनजागृती मोहिमा, व्यक्तिगत आणि सामाजिक आचरण याचा समावेश आहे. दररोज महाराजांना अभिवादन व इतिहास वाचन, व्यसनमुक्त जीवनशैली, शिस्तबद्ध व सुसंस्कृत वर्तन, धर्म आणि राष्ट्राचा आदर राखणे यावर विशेष भर दिला जातो.

# महाराष्ट्र–पंजाब आध्यात्मिक नाते अधिक दृढ; महापौर

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**शिख धर्मग्रंथ गुरु ग्रंथ साहिब मध्ये संत परंपरेतील संतांच्या वाणीसह संत नामदेव यांच्या अभंगांचा समावेश असणे ही महाराष्ट्र आणि पंजाब यांच्यातील आध्यात्मिक व सांस्कृतिक नात्याची जिवंत साक्ष आहे. भक्ती, समता आणि मानवतेचा संदेश देणारा हा सांस्कृतिक वारसा दोन्ही राज्यांना एका सूत्रात बांधणारा आहे, असे प्रतिपादन पिंपरी-चिंचवडचे महापौर रवि लांडगे यांनी केले.**



पिंपरी चिंचवड महापालिका संचलित जगद्गुरू संत तुकाराम महाराज संतपीठ यांच्या वतीने पंजाबमधील घुमान येथे नुकत्याच पार पडलेल्या पाच दिवसीय अभ्यास दौऱ्यात सहभागी झालेल्या १८ सदस्यांचा दिवंगत महापौर मधुकर पवळे सभागृहात महापौरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते.

**घुमान येथील संत नामदेव मंदिरात ऐतिहासिक हिंदी कीर्तन**

अभ्यास दौऱ्यादरम्यान प्रतिनिधींनी घुमान इंटरनॅशनल पब्लिक स्कूल येथे भेटी दिल्या. तसेच घुमान येथील संत नामदेव महाराज मंदिर येथे संतपीठाचे संचालक हभप राजू महाराज ढोरे यांनी “तु अगाध वैकुंठनायका | तेरे चरणो मेरा माथा ||” या अभंगावर हिंदीत कीर्तन सेवा सादर केली. महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायाच्या परंपरेनुसार घुमान येथील मूळ मंदिरात प्रथमच हिंदीत कीर्तन सेवा पार पडली. यापूर्वी १९७० साली हभप ज्ञानेश्वर माऊली देहूकर-पंढरपूर फड यांनी मंदिरासमोर सप्ताह केला होता. त्यानंतर प्रथमच संतपीठाच्या माध्यमातून ही कीर्तनसेवा साकारली गेली, ही बाब विशेष उल्लेखनीय ठरली.

> “शिख धर्मग्रंथ गुरु ग्रंथ साहिब मध्ये संत नामदेव महाराजांच्या अभंगांचा समावेश असणे ही महाराष्ट्र आणि पंजाब यांच्यातील आध्यात्मिक ऐक्याची जिवंत साक्ष आहे. संतांच्या विचारांमधून भक्ती, समता आणि मानवतेचा जो संदेश दिला जातो, तो दोन्ही राज्यांना एका सूत्रात बांधतो. घुमान येथील अभ्यास दौऱ्यामुळे सांस्कृतिक देवाणघेवाण अधिक बळकट होईल.
>
> – रवि लांडगे, महापौर, पिंपरी-चिंचवड, पुणे.

# छत्रपतींचा अवमान करणाऱ्या काँग्रेसविरोधात भाजपाचे 'जोडे मारो'

## काँग्रेसचे नेते हर्षवर्धन सपकाळ यांच्या हकालपट्टीची मागणी | भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांच्या नेतृत्त्वात पिंपरीत आंदोलन

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**भारतीय जनता पार्टी पिंपरी चिंचवड शहराच्या वतीने आज पिंपरी चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ जोरदार निदर्शने करण्यात आली. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि टिपू सुलतान यांची तुलना केल्याचा आरोप करत भाजपने तीव्र निषेध व्यक्त केला. आंदोलनादरम्यान सपकाळ यांच्या प्रतिमेस जोडे मारत घोषणाबाजी करण्यात आली आणि त्यांच्या तात्काळ हकालपट्टीची मागणी करण्यात आली.**




> "छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा आणि विचारांचा अवमान कोणत्याही परिस्थितीत सहन केला जाणार नाही. महाराष्ट्राच्या अस्मितेशी निगडित असलेल्या या विषयावर आम्ही ठाम आहोत. संबंधितांकडून तात्काळ माफी आणि योग्य ती कारवाई झाली नाही, तर जनतेच्या भावनांचा सन्मान राखण्यासाठी आम्ही लोकशाही मार्गाने अधिक तीव्र आंदोलन उभारू. शिवरायांचा सन्मान अबाधित ठेवणे हीच आमची भूमिका आणि बांधिलकी आहे."
>
> – शत्रुघ्न उर्फ बापू काटे, **शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

शहराध्यक्ष शत्रुघ्न उर्फ बापू काटे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात कार्यकर्त्यांनी काँग्रेसविरोधी घोषणा देत परिसर दणाणून सोडला. "शिवरायांचा अवमान सहन केला जाणार नाही" अशा घोषणा देत संताप व्यक्त करण्यात आला.

यावेळी बोलताना शत्रुघ्न काटे म्हणाले की, "छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राचे आराध्य दैवत आहेत. त्यांच्या कार्याची आणि विचारांची तुलना इतर कोणत्याही सत्ताधीशांशी करणे म्हणजे महाराष्ट्राच्या अस्मितेवर आघात आहे. असे वक्तव्य करणाऱ्यांविरुद्ध काँग्रेसने केवळ माफीवर न थांबता कठोर कारवाई करावी. अन्यथा भाजप राज्यभर तीव्र आंदोलन छेडेल." आंदोलनात आमदार उमाताई खापरे, गटनेते प्रशांतभाऊ शितोळे, सदाशिवराव खाडे, सरचिटणीस मोरेश्वरभाऊ शेडगे, मधुकरभाऊ बच्चे, वैशालीताई खाडे यांच्यासह शहरातील प्रमुख लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने कार्यकर्ते सहभागी झाले होते. दरम्यान, काँग्रेसने या प्रकरणी ठोस भूमिका जाहीर न केल्यास आगामी काळात आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा भाजप पदाधिकाऱ्यांनी दिला आहे. पिंपरी चिंचवडमधील या आंदोलनामुळे राजकीय वातावरण तापले असून राज्यभर या विषयावर प्रतिक्रिया उमटत आहेत.

# आकुर्डीतील डी. वाय. पाटील बी. फार्मसीला एनबीए पुनःमानांकन

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**आकुर्डी येथील डॉ. डी. वाय. पाटील औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयाने आपल्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. महाविद्यालयाच्या बी. फार्मसी अभ्यासक्रमाला 'नॅशनल बोर्ड ऑफ ॲक्रेडिटेशन' (NBA) कडून पुन्हा एकदा पुढील तीन वर्षांसाठी मानांकन प्राप्त झाले आहे. या यशामुळे दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याबाबतची महाविद्यालयाची बांधिलकी पुन्हा एकदा सिद्ध झाली आहे.**

### सांघिक प्रयत्नांचे फळ: डॉ. निरज व्यवहारे

"महाविद्यालयाचे सर्व अंतर्गत व बाह्य घटक, कर्मचारी आणि विद्यार्थी यांच्या सक्रिय सहकार्यामुळेच हे यश मिळाले आहे," असे मत प्राचार्य डॉ. निरज व्यवहारे यांनी व्यक्त केले.

### मान्यवरांकडून कौतुक

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री. सतेज पाटील, विश्वस्त श्री. तेजस पाटील आणि संकुल संचालक रियर ॲडमिरल अमित विक्रम (नि.) यांनी महाविद्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले. श्री. सतेज पाटील: " हे मानांकन विद्यार्थी केंद्रित शिक्षणासाठी आणि भविष्यातील वाटचालीसाठी प्रेरणादायी ठरेल." श्री. तेजस पाटील: "अभिनंदनासोबतच, ज्या निकषांवर कामगिरी अजून उंचावता येईल, त्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू ठेवावेत." श्री. अमित विक्रम: "महाविद्यालयाने केलेल्या सांघिक प्रयत्नांचे हे फलित आहे."

या यशामुळे शैक्षणिक क्षेत्रात महाविद्यालयाचा नावलौकिक अधिक वाढला असून विद्यार्थ्यांमधूनही आनंदाचे वातावरण व्यक्त होत आहे.




> "आमच्या औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयाला मिळालेले 'एनबीए'चे पुनःमानांकन हे आमच्या गुणवत्तेवर बसलेली अधिकृत मोहोर आहे. आम्ही केवळ पदव्या देणारे केंद्र नसून, जागतिक दर्जाचे 'फार्मसी' तज्ज्ञ घडवणारी संस्था आहोत, याची ही प्रचिती आहे.
> विद्यार्थी हाच आमच्या सर्व धोरणांचा केंद्रबिंदू राहिला आहे. आधुनिक प्रयोगशाळा, अनुभवी प्राध्यापक आणि संशोधनाला पोषक वातावरण यामुळेच हे यश शक्य झाले. हे यश महाविद्यालयाचे प्राचार्य, सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सांघिक कष्टाचे फळ आहे. हे मानांकन आम्हाला भविष्यात अधिक जोमाने शैक्षणिक नवनवीन उपक्रम राबवण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना प्रगत शिक्षण देण्यासाठी नक्कीच प्रेरणा देणारे ठरेल."
>
> – सतेज पाटील, अध्यक्ष, डॉ. डी. वाय. पाटील संकुल, आकुर्डी.

### सखोल मूल्यमापनानंतर मानांकन

एनबीएच्या वतीने करण्यात आलेल्या या प्रक्रियेत महाविद्यालयाच्या सर्वांगीण प्रगतीचा आढावा घेण्यात आला. यामध्ये प्रामुख्याने महाविद्यालयाचा दृष्टिकोन, शैक्षणिक ध्येयधोरणे, अध्यापन - अध्ययन प्रक्रिया आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देण्यात आला. तसेच, तज्ज्ञ प्राध्यापक वर्ग, आधुनिक पायाभूत सुविधा, प्रभावी प्रशासन आणि आर्थिक संसाधनांचे योग्य व्यवस्थापन या निकषांवर महाविद्यालयाचे सखोल मूल्यमापन करण्यात आले.

# डॉ. डी. वाय. पाटील कॉलेजचा आर्किटेक्चर क्षेत्रासाठी राष्ट्रीय उपक्रम

## तंत्रज्ञान, वारसा संवर्धन व व्यावसायिक नीतिमत्तेवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**आर्किटेक्चर क्षेत्रातील नवनवीन तंत्रज्ञान आणि आव्हानांवर विचारमंथन करण्यासाठी पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, आकुर्डी येथे आयोजित 'इनोव्हेशन इन आर्किटेक्चर, टेक्नॉलॉजी अँड अलाईड फील्ड्स' ही दोन दिवसीय राष्ट्रीय परिषद उत्साहात पार पडली. देशभरातील वास्तुविशारद, संशोधक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.**




परिषदचे उद्घाटन नामवंत संरक्षक डॉ. बेनी कुरीकोस आणि 'कौन्सिल ऑफ आर्किटेक्चर, नवी दिल्ली'चे अध्यक्ष आर्किटेक्ट अभय पुरोहित यांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटन प्रसंगी डॉ. बेनी कुरीकोस यांनी ऐतिहासिक वारसा जतन करताना आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर कसा करता येईल, याविषयी मार्गदर्शन केले. तर आर्किटेक्ट अभय पुरोहित यांनी विद्यार्थ्यांना व्यावसायिक नीतिमत्ता आणि बदलत्या जागतिकरणानंतर वास्तुविशारदांनी स्वतःला सुसंगत ठेवण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

राष्ट्रीय परिषदेच्या बक्षिस समारंभासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. प्रभाकर देसाई प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. संस्थेचे संचालक तेजस सतेज पाटील, कार्यकारी संचालक ॲडमिरल अमित विक्रम (रिटायर्ड) आणि मुख्य वित्त अधिकारी बिपीन शर्मा यांनी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे कौतुक केले.

> आर्किटेक्चर फक्त इमारती उभारण्यापुरते मर्यादित नाही; ते नव्या तंत्रज्ञानाचा वापर करून शाश्वत, सर्जनशील आणि सामाजिकदृष्टीने उपयुक्त वातावरण निर्माण करण्याचे माध्यम आहे. या परिषदेत देशभरातील विद्यार्थी आणि विशेषज्ञांनी आपले अनुभव व ज्ञान शेअर केले, ज्यामुळे सर्व उपस्थितांना नवीन दृष्टिकोन मिळाला.
>
> – छाया तिरवीर, प्राचार्या.

### संशोधन वृत्तीला प्रोत्साहन...

परिषदेच्या दोन दिवसांत पर्यावरणपूरक डिझाइन, आधुनिक एआय चा आर्किटेक्चर क्षेत्रातील वापर, शाश्वत विकास यांसारख्या विषयांवर सखोल तांत्रिक सत्रांचे आयोजन करण्यात आले. देशभरातील शिक्षकवर्ग आणि विद्यार्थ्यांनी आपले संशोधन सादर केले असून उत्कृष्ट प्रकल्पांचा गौरव करण्यात आला. याशिवाय, नामवंत वास्तुविशारदांनी त्यांच्या प्रकल्पांतील अनुभव शेअर केले, ज्यामुळे विद्यार्थ्यांना व्यवहारिक ज्ञानाची मोलाची शिदोरी मिळाली. परिषदेसाठी संयोजक व प्रभारी प्राचार्या आर्किटेक्ट छाया तिरवीर यांनी संपूर्ण सत्रांचे आणि समन्वयाचे यशस्वी नियोजन केले. या परिषदेचे यशस्वी आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धनंजय चौधरी व आर्किटेक्ट छाया तिरवीर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. त्यांच्या नेतृत्वाखाली परिषदेने शैक्षणिक व तांत्रिक स्तरावर उच्चांक प्रस्थापित केला आणि संशोधन वृत्तीला प्रोत्साहन दिले.

# हिंद-दी-चादर निमित्त बंजारा समाजाची महापालिकेत बैठक

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त नवी मुंबईतील खारघर येथे आयोजित करण्यात येणाऱ्या 'हिंद-दी-चादर' या भव्य कार्यक्रमाच्या अनुषंगाने संत सेवालाल जयंतीचे औचित्य साधून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने बंजारा समाजाच्या प्रतिनिधींची बैठक आयोजित करण्यात आली होती. पिंपरी चिंचवड शहरातील सर्व समाजघटकांनी या ऐतिहासिक कार्यक्रमात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन यावेळी महापालिकेच्या वतीने करण्यात आले.**

बैठकीला उपायुक्त अण्णा बोदडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, सहाय्यक सुरक्षा अधिकारी प्रमोद निकम, उप अभियंता संजय जाधव यांच्यासह नितीन चव्हाण, रावसाहेब राठोड, रमेश राठोड, अविनाश राठोड, रवि राठोड, रोहित चव्हाण, किशोर चव्हाण, सुभाष चव्हाण, रघुनाथ चव्हाण, कार्तिक पवार, अमोल पवार, बालाजी राठोड, दिलीप आडे यांच्यासह बंजारा समाजातील पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते.

उपायुक्त अण्णा बोदडे यांनी बैठकीत बोलताना 'हिंद-दी-चादर' कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर समाजातील सर्व घटकांनी समन्वयाने कार्य करणे आवश्यक असल्याचे सांगितले. महापालिकेकडून या कार्यक्रमाबाबत व्यापक जनजागृती करण्यात येत आहे. युवक व महिलांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करण्यासोबतच नियोजनबद्ध पद्धतीने उपस्थिती वाढविण्यासाठी स्थानिक स्तरावर बैठका व संपर्क अभियान राबवले जात आहे, असेही ते म्हणाले.



विशेष अधिकारी किरण गायकवाड यांनी कार्यक्रमाच्या आयोजनात्मक बाबींविषयी मार्गदर्शन केले. ते म्हणाले, शहरातून खारघर येथे जाणाऱ्या नागरिकांच्या समन्वयासाठी आवश्यक नियोजन, माहिती प्रसार, सोशल मीडियाद्वारे जनजागृती तसेच विविध समाजघटकांशी सातत्याने संपर्क ठेवला जात आहे. 'हिंद-दी-चादर' हा केवळ धार्मिक कार्यक्रम नसून सामाजिक ऐक्य आणि बंधुभाव वृद्धिंगत करणारा उपक्रम आहे, असे देखील ते म्हणाले.

बैठकीत बंजारा समाजाच्या प्रतिनिधींनीही कार्यक्रमात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचा निर्धार व्यक्त केला. पिंपरी चिंचवड शहरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळविण्यासाठी महापालिका व समाज प्रतिनिधी समन्वयाने कार्य करतील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

www.rklgis.org

RKL GALAXY™ International School
CBSE Affiliated School | Jain Minority Institution

# TEACHERS' HIRING

**WALK-IN INTERVIEW**

Hiring teachers for all subjects across Pre-Primary, Primary, and Secondary sections for the academic year 2026–27.

## Walk-In Schedule Timings:

**Saturday, 21st February 2026**
**Timing: 11:00 AM to 4:00 PM**

**Monday to Friday**
**Timing: 2:00 PM to 4:30 PM**

## Venue:

RKL Galaxy International School, Sr. No. 149/5, Opp. Alankapuram Society, Wadmukhwadi, Alandi Road, Pune – 412105

www.rklgis.org 8698360005

